मी ईश्वराला स्मरुन शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि ख-या शिवाय काहीही सांगणार नाही.

<u>फिर्यादी सुभाष गणपत निघोट यांचा सरतपास वकील श्री. एन. आर. निघोट यांच्या मार्फत शपथेवर सुरु.</u>

१. आता मला आरोपीने दिलेला दिनांक १८/०१/२०२२ रोजीचा, युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा वाबळे इस्टेट, ठाणे, धनादेश क्र.००३६१५ असलेला रक्कम रु.१,००,०००/- चा धनादेश दाखविला. त्यावर आरोपीची सही आहे. सदर सही मी ओळखतो. सदर धनादेशामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यांस **निशाणी क्र.१८** देण्यात येते. आता मला आरोपीने दिलेला दिनांक २०/०१/२०२२ रोजीचा, युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा वाबळे इस्टेट, ठाणे, धनादेश क्र.००३६२० असलेला रक्कम रु.२,००,०००/- चा धनादेश दाखविला. त्यावर आरोपीची सही आहे. सदर सही मी ओळखतो. सदर धनादेशामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यांस **निशाणी क्र.१९** देण्यात येते.

२. सदरचे दोन्ही धनादेश मी वटविण्याकरीता शरद सहकारी बँक, शाखा मंचर येथे भरला असता दोन्ही धनादेश न वटता परत आले. त्याबाबतचे दि.२१/०३/२०२२ रोजीचे दोन बँक रिटर्न मेमो मला दाखविण्यात आला. त्यावर बँकेच्या अधिका-याची सही आहे. त्यांना अनुक्रमे **निशाणी क्र.२० व २१** देण्यात येते.

३. आता मला धनादेशाच्या रकमेची मागणी करण्याकरिता वकीलांमार्फत आरोपीस पाठविलेल्या दि.०६/०४/२०२२ नोटीसची ऑफीस कॉपी दाखविण्यात आली. त्यावर वकीलांची सही व शिक्का आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.२२** देण्यात येते. सदर नोटीस आरोपीला पाठविल्याची पोष्टाची रिसिट दाखल केली आहे. त्यांस **निशाणी क्र.२३** देण्यात येते. सदर नोटीस आरोपीने न स्विकारल्याने त्याचा लखोटा परत आला. त्यांस **निशाणी क्र.२४** देण्यात येते.

४. माझे व आरोपीचे कांद्याचे व्यवहार होते. आरोपीने कांदा खरेदी केल्याबाबतच्या दि.०८/०६/२०२१, १३/०६/२०२१, १७/०६/२०२१ व २७/०६/२०२१ पावत्या दाखल केल्या आहेत. त्या सर्व पावत्यांवर माझी सही व शिक्का आहे. त्या सर्व पावत्यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्या पावत्यांना अनुक्रमे **निशाणी क्र.२५, २६, २७ व २८** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपी व आरोपीतर्फे वकीलांचा पुकारा केला असता गैरहजर. सबब प्रकरण उलटतपासाकरीता पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्विकृत

**सही/-**
**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**घोडेगाव, पुणे.**

**दिनांकः १०/०९/२०२५.**
**घोडेगाव**